# —: प्रेस नोट:—

# जिल्हा परिषद नागपूर कार्यालयातील लेखा विभागाचे सहाय्यक लेखा अधिकारी ॲसीबीच्या जाळयात

जिल्हा परिषद नागपूर विभागातील सुदाम वामनराव पांगुळ, वय ५४ वर्षे पद – सहाय्यक लेखा अधिकारी, वित विभाग जिल्हा परिषद नागपूर यांना ४,५००/– रूपयांची लाच स्विकारतांना ॲन्टी करप्शन ब्युरोच्या पथकाने रंगेहात पकडले आहे. जिल्हा परिषद विभागाचे सहाय्यक लेखा अधिकारी पदाच्या कर्मचाऱ्यावर ॲन्टी करप्शन ब्युरो ने केलेल्या कारवाईमुळे प्रचंड खळबळ उडाली आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, यातील तक्रारदार हे न्यु कैलासनगर, मानेवाडा नागपूर येथील रहीवासी असुन शासकीय कंत्राट घेवुन बांधकामाचे काम करतो. तक्रारदाराने जिल्हा परिषद नागपूर कार्यालयाल अंतर्गत मौदा उपविभाग येथे एकुण ९ कामांची निविदा घेतली होती. तक्रारदराने एकुण ९ निविदाचे काम वेळेत पुर्ण करून केलल्या कामाचे बिलाची फाईल जिल्हा परिषद नागपूर कार्यालयातील लेखा विभाग मध्ये कार्यरत असलेले सहाय्यक लेखा अधिकारी सुदाम वामनराव पांगुळ यांचेकडे मंजुरी करीता देल्या असता सुदाम वामनराव पांगुळ यांनी तक्रारदारास एकुण ९ बिलाच्या फाईल मंजुरीकरिता ४५००/–रू लाचेची मागणी केली. तक्रारदार याची लाच रक्कम देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर येथील अधिकाऱ्यांना भेटून तक्रार नोंदविली.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर चे पोलीस उपअधीक्षक श्री. संदीप जगताप यांनी तक्रारदाराने दिलेल्या तक्रारीची अत्यंत गोपनीय रित्या शहानिशा करून सहाय्यक लेखा अधिकारी यांचे विरूध्द योजनाबध्दरित्या आज दि. २३/१०/२०१९ रोजी यशस्वी सापळा कारवाईचे आयोजन करून त्यामध्ये सुदाम वामनराव पांगुळ यांनी तक्रारदारास केलेल्या एकुण ९ निवीदाचे कामाचे बिलांचे फाईल मंजुरीकरिता ४,५००/–रू लाचेची मागणी करून जिल्हा परिषद कार्यालय नागपूर येथील लेखा विभागाचा कार्यालयात लाच रक्कम स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या चमुने रंगेहात पकडले. सहाय्यक लेखा अधिकारी सुदाम वामनराव पांगुळ विरूध्द पोलीस स्टेशन सदर नागपूर शहर येथे गुन्हा दाखल करून अटक करण्यात आले. सहाय्यक लेखा अधिकारी सुदाम वामनराव पांगुळ यांच्या नागपूर येथील निवासस्थानाची ॲन्टी करप्शन विभागाची टीम/चमु द्वारा झडती सुरू आहे.

**सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक श्रीमती रश्मि नांदेडकर, व अपर पोलीस अधीक्षक श्री राजेश दुद्दलवार, ॲन्टी करप्शन ब्युरो, नागपूर यांचे मार्गदर्शनात पोलीस उप अधीक्षक श्री संदीप जगताप, पोहवा प्रविण पडोळे, सुनिल कळंबे, दिनेश शिवले, नापोशि प्रभाकर बले, चापोहवा वकील शेख लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर यांनी केलेली आहे.**

पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, नागपूर
दुरध्वनी क्रमांक – ०७१२–२५६१५२०
टोल फ्रि क्रमांक – १०६४